स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी

सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा संशोधन आराखडा

: संशोधनाचा विषय :

"शरदचंद्र पवार यांनी महिला व शेतकरी यांच्या संदर्भात राबवलेल्या धोरणांचा समाजशास्त्रीय अभ्यास"

- संशोधक -

अविनाश तानाजी टिके

पवार नगर, औसा. ता. औसा, जि. लातूर

संपर्क क्र. ९९७५१३२८८५

- सांशोधन मार्गदर्शक -

प्रा.डॉ. जे. डी. साळुंके

समाजशास्त्र विभाग,

आझाद महाविद्यालय, औसा. ता. औसा, जि.लातूर

संपर्क क्र. ९८९०५०३४८३

संशोधन केंद्रः महात्मा बसवेश्वर महविद्यालय, लातूर

[सन – २०२४]

“शरदचंद्र पवार यांनी महिला व शेतकरी यांच्या संदर्भात राबवलेल्या धोरणांचा समाजशास्त्रीय अभ्यास”

प्रस्तावना:

कोणतेही राजकीय व्यक्तिमत्व समाजातूनच घडत असते किंबहुना समाजच त्या राजकीय व्यक्तिमत्वास अथवा नेतृत्वास घडवत असतो. समाजातून तयार झालेल्या अशा राजकीय नेतृत्वाने घेतलेले निर्णय, आखलेली धोरणे समाजावर चांगला - वाईट प्रभाव टाकत असतात. शरदचंद्र गोविंदराव पवार हे महाराष्ट्रासह देशभरात सर्वांना परिचित असलेले आणि मोठे सामाजिक, राजकीय वलय असणारे नेते आहेत. विद्यार्थी चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व, कमी वयात आमदार, सर्वात तरुण मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. मागील पाच - सहा दशकांपासून ते अविरतपणे समाजकारण व राजकारणात सक्रिय आहेत. वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असताना त्यांनी सर्वसामान्यांसाठी वेगवेगळी धोरणे आखली व अनेक निर्णय घेतले. त्यांचे कृषी, शिक्षण, क्रीडा, कला, साहित्य, उद्योग, सामाजिक सलोखा, आपत्ती व्यवस्थापन, महिला सक्षमीकरण इ. क्षेत्रांतील योगदान अनन्यसाधारण महत्वाचे आणि उल्लेखनीय आहे. या विविध क्षेत्रांपैकीच त्यांनी महिला व शेतकरी यांच्या संदर्भात राबवलेल्या धोरणांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनात राहणार आहे.

संशोधन विषयाची निवड:

शरदचंद्र पवार हे राष्ट्रीय नेते आहेत. त्यांचे राजकीय वलय हे महाराष्ट्रापुरतेच मर्यादित नसून त्यांच्या कर्तृत्वाची छाप संपूर्ण देशावर आहे. हे देशव्यापी नेतृत्व महाराष्ट्राच्या भूमीतून तयार झालेले असल्याने त्यांच्या जडण - घडणीवर महाराष्ट्राच्या सामाजिक पुरोगामित्वाचा प्रभाव आहे. त्यांच्या ध्येय धोरणांची, त्यांनी घेतलेल्या निर्णयांची समाजातून कधी स्तुती होते, तर कधी त्यांच्यावर टोकाची टिकाही होते. पण त्यांनी घेतलेले निर्णय परिणामकारक असतात. लोक त्यांची स्तुती करू शकतात, त्यांच्यावर टिकाही करू शकतात पण लोक त्यांना टाळू शकत नाहीत.

त्यांचे कार्य कर्तृत्व विविध क्षेत्रात आहे. त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाचे परिणाम समाजावर झालेले आहेत. म्हणूनच त्यांनी महिला व शेतकरी यांच्या संदर्भात राबवलेल्या धोरणांचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

संशोधनाचे महत्व:

राजकीय नेते अनेक असतात पण आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून काम करणारे राजकारणातील समाजकारणी नेते मोजकेच असतात. शरदचंद्र पवार यांचा राजकीय प्रवास आणि त्याचा विस्तार फार मोठा आहे. राजकारणात मोठी उंची गाठून सुद्धा त्यांनी समाजातील तळागाळातील लोकांशी असलेली नाळ तुटू दिली नाही. ते कायम समाजातील शेवटच्या घटकाच्या विकासाचा विचार करतात. त्यांच्या अंगी असलेली दूरदृष्टी हि त्यांनी आखलेल्या धोरणांतून आणि घेतलेल्या निर्णयांतून दिसून येते. म्हणूनच “शरदचंद्र पवार यांनी महिला व शेतकरी यांच्या संदर्भात राबवलेल्या धोरणांचा समाजशास्त्रीय अभ्यास” करणे महत्वाचे आहे.

संशोधन मर्यादा:

शरदचंद्र पवार यांची सामाजिक व राजकीय कारकीर्द प्रदीर्घ आहे. या काळात त्यांनी विविध क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. त्यांच्या सर्वच क्षेत्रातील योगदानांचा एकत्रित विचार या संशोधन प्रबंधात करणे खूप व्यापक होईल. म्हणूनच हे संशोधन त्यांनी महिला व शेतकरी यांच्यासाठी राबवलेल्या धोरणांपुरते मर्यादित असेल.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. शरदचंद्र पवार यांची कौटुंबिक पार्श्वभूमी समजून घेणे.

२. त्यांच्या शैक्षणिक जीवनाचा आढावा घेणे.

३. शरदचंद्र पवार यांचा सामाजिक व राजकीय प्रवास जाणून घेणे.

४. महिलांसंदर्भात शरदचंद्र पवार यांनी राबवलेल्या धोरणांचा अभ्यास करणे.

५. शरदचंद्र पवार यांनी महिलांसंदर्भात राबवलेल्या धोरणांचे परिणाम जाणून घेणे.

६. शेतकऱ्यांसंदर्भात शरदचंद्र पवार यांनी राबवलेल्या धोरणांचे अध्ययन करणे.

७. शरदचंद्र पवार यांनी शेतकऱ्यांसंदर्भात राबवलेल्या धोरणांचे परिणाम समजून घेणे.

संशोधनाची गृहीतके:

१. शरदचंद्र पवार हे पश्चिम महाराष्ट्रातील एका शेतकरी व पुरोगामी विचारांच्या कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व आहेत .

२. त्यांच्या कुटुंबावर सुरुवातीस काँग्रेस पक्षाचा व नंतर डाव्या विचारांशी सुसंगत शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव होता.

३. कुटुंबात शिक्षणासाठी पोषक वातावरण होते.

४. श्री. यशवंतराव चव्हाण यांचा सहवास त्यांना विद्यार्थीदशेपासून मिळाला, प्रथम संघटनात्मक कामे व त्यानंतर संसदीय राजकारणात त्यांचा प्रवेश झाला.

५. मागील पाच - सहा दशकांपासून शरदचंद्र पवार हे संसदीय राजकारण व समाजकारणात सक्रिय आहेत.

६.	आई शारदाबाई पवार यांचा खूप मोठा प्रभाव शरदचंद्र पवार यांच्या व्यक्तिमत्वावर आहे.

७.	महिलांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांचा सामाजिकस्तर उंचावणे यासाठी शरदचंद्र पवार यांनी प्रयत्न केले आहेत.

८.	देशात सर्वप्रथम महाराष्ट्रात महिला धोरण अवलंबणारे शरदचंद्र पवार हे पहिले मुख्यमंत्री आहेत.

९.	स्त्री -पुरुष समानतेचा संदेश शरदचंद्र पवार यांनी स्वकृतीतून दिला आहे.

१०.	शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शरदचंद्र पवार यांनी विविध धोरणे आखली आणि राबवली आहेत.

११.	देशातील कृषिक्षेत्रात अमूलाग्र बदल करण्यात शरदचंद्र पवार यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

१२.	शरदचंद्र पवार यांनी महिला व शेतकरी यांच्यासंदर्भात राबवलेल्या धोरणांचा परिणाम समाजावर झाला आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी व्यष्टी अध्ययन पद्धती, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच तथ्य संकलन पद्धतीमध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतातून मिळणारी माहिती, मुलाखती, संसद व विधानसभेतील भाषणे व उपलब्ध द्रक-श्राव्य साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

नमुना निवड:

सदरील संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार असून प्रामुख्याने उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करून विषय मांडणी करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा:

“शरदचंद्र पवार यांनी महिला व शेतकरी यांच्या संदर्भात राबवलेल्या धोरणांचा समाजशास्त्रीय अभ्यास” या विषयाची मांडणी परिचयात्मक संशोधन आराखड्याच्या माध्यमातून पुढील प्रकरणांच्या आधारे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले: प्रस्तावना

या प्रकरणामध्ये शरदचंद्र पवार यांच्या व्यक्तित्वाचा व त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेवून प्रस्तावनेसह विषय मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे: संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणामध्ये संबंधित संशोधन पूर्ण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या संशोधन पद्धतींची मांडणी करण्यात येईल, तसेच शरदचंद्र पवार यांच्यावर लिहिलेल्या संदर्भ साहित्याचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण तिसरे: महिलांसंदर्भात शरदचंद्र पवार यांनी राबवलेली धोरणे

शरदचंद्र पवार यांचा महिलांबाबतचा दृष्टिकोन व त्यांनी महिलांबाबाबत राबवलेली धोरणे यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण चौथे: शरदचंद्र पवार यांनी महिलांसंदर्भात राबवलेल्या धोरणांचे परिणाम

महिलांसंदर्भात शरदचंद्र पवार यांनी राबवलेल्या धोरणांचे नेमके काय परिणाम झाले याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पाचवे: शेतकर्त्यांसंदर्भात शरदचंद्र पवार यांनी राबवलेली धोरणे

शेती व शेतकरी यांच्यासाठी शरदचंद्र पवार यांनी राबवलेल्या योजना व धोरणांचा आढावा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण सहावे: शरदचंद्र पवार यांनी शेतकऱ्यांसंदर्भात राबवलेल्या धोरणांचे परिणाम

शेतकऱ्यांसंदर्भात शरदचंद्र पवार यांनी राबवलेल्या धोरणांच्या परिणामांचे सविस्तर विश्लेषण सदरील प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण सातवे: निष्कर्ष व समारोप

"शरदचंद्र पवार यांनी महिला व शेतकरी यांच्यासंदर्भात राबवलेल्या धोरणांचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना शरदचंद्र पवार यांच्या धोरणांचा, त्यांच्या कार्याचा तटस्थपणे अभ्यास करण्यात येईल व त्यानुसार प्रस्तुत प्रकरणात पूर्व प्रकरणांआधारे जो निष्कर्ष निघेल त्याचा परामर्श घेण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ सूची:

१) शरद पवार, लोक माझे सांगाती, राजहंस प्रकाशन प्रा.लि.पुणे, डिसेंबर २०१५

२) डॉ.पवन मांडवकर, शरद पवार,डॉ.भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर, कळंब, जि.यवतमाळ, १२ डिसेंबर २०२०

३) मधुकर भावे, एकमेव, मनिषा प्रकाशन, मुंबई, १२ डिसेंबर २०१०

४) ना.धो.महानोर, शरद पवार आणि मी, समकालीन प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०२०

५) शरद पवार, काटेवाडी ते मंत्रालय, अविष्कार प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर २००८

६) Dr. Janardhan Waghmare, Sharad Pawar: Profile in Leadership, Sanjay Bansode (Publisher), Latur, 1 May 2009

७) डॉ. सुधिर भोंगळे, नेमकचि बोलणे, सुज्ञान प्रकाशन, पुणे, १२ डिसेंबर २०२१

८) विजय चोरमारे (सपा.), शरद पवार आणि महाराष्ट्र (भाग-१), स्ट्रॅटेजी कार्पोरेशन, पुणे, जानेवारी २०२३

९) अभय टिळक (अनु.), अरुण टिकेकर (सपा.), स्पर्धा काळाशी : शरद पवार ; रोहन प्रकाशन, पुणे, मार्च २०२१

१०) डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोणी, ॲड. मृणाल कुलकर्णी, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.

११) डॉ. बी. एम. कऱ्हाडे, शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै २००७.

संशोधक -
अविनाश तानाजी टिके
पवार नगर, औसा. ता.औसा जि.लातूर-४१३५२०
संपर्क क्र. ९९७५१३२८८५

सांशोधन मार्गदर्शक -
प्रा.डॉ.जे.डी.साळुंके
समाजशास्त्र विभाग, आझाद महाविद्यालय,
औसा. ता.औसा जि.लातूर
संपर्क क्र. ९८९०५०३४८३